# गांधी एज्युकेशन सोसायटी कुंडलचे
# क्रांतिअग्रणी जी. डी. बापू लाड महाविद्यालय, कुंडल
# ता. पलूस जि. सांगली
# अग्रणी महाविद्यालय योजने अंतर्गत एक दिवशीय कार्यशाळा
# विषयः बौद्धिक मालमत्ता अधिकार
# दि. 31/01/2020
# अहवाल

आमचे क्रांतिअग्रणी जी. डी. बापू लाड महाविद्यालयात षुक्रवार दिनांक 31/01/2020रोजी शिवाजी विद्यापीठाच्या अग्रणी महाविद्यालय योजने अंतर्गत ‘बौद्धिक मालमत्ता अधिकार’ या विषयावर एक दिवशीय कार्यशाळा संपन्न झाली. सदर कार्यक्रमा करीता दोन सत्रांचे आयोजन करण्यात आले होते. प्रथम सत्रात कार्यशाळेस मार्गदर्शक व्यक्ती म्हणून उपस्थित असणारे वक्ते, शिक्षक, विद्यार्थी यांची नाव नोंदणी, चहा व अल्पोपहार आणि कार्यशाळेच्या उद्‌घाटनाचा समावेश होता.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक व स्वागत महाविद्यालयाचे इंग्रजी विभागप्रमुख  डॉ. बी. डी. वाघमारे यांनी केले. यावेळी बोलताना त्यांनी महाविद्यालयात सन 2019-20या शैक्षणिक वर्षात अग्रणी महाविद्यालय योजना व त्याचा हेतू, उद्देश आणि फलश्रुती याबाबत सविस्तरपणे संबोधित केले. कार्यशाळेचे उद्‌घाटन शिवाजी विद्यापीठ इंग्रजी विभागातील डॉ. ए. एम. सरवदे यांचे हस्ते झाले. त्यांनी बौद्धिक मालमत्ता अधिकारातील असलेल्या विविध संधींचा आढावा घेतला. कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.. पी. बी. लाडहे होते. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन अग्रणी विभागप्रमुख डॉ.. व्ही. आर. माने यांनी मानले.

प्रथम सत्रामध्ये बौद्धिक मालमत्ता अधिकारया विषयावर शिवाजी विद्यापीठातील इंग्रजीविभागाच्या डॉ. ए. एम. सरवदे यांचे व्याख्यान झाले. त्यांनी आपल्या व्याख्यानांमध्ये बौद्धिक मालमत्ता अधिकारक्षेत्रामध्ये सध्याच्या काळामध्ये वाढत्या संधी व या संधींची उपयुक्तता व्यक्त केली. या सत्राचे आभार डॉ. डी. डी. खळदकर यांनी मानले.

दुसऱ्या सत्रामध्ये इस्लामपूर येथील प्रा. ए. ए. शिदे यांचे व्याख्यान झाले. आपल्या व्याख्यानामध्ये त्यांनी बौद्धिक मालमत्ता अधिकारसंबंधित असलेल्या विविध संधी विविध उदाहरणासहीत स्पष्ट केल्या तसेच याची भविष्यातील उपयुक्तता यावर आपले मत व्यक्त केले. कार्यक्रमाचे आभार सौ. एस. पी. खरात यांनी मानले.

यानंतर शाकाहारी भोजनाची व्यवस्था करण्यात आली होती. भोजनानंतर उपस्थितांना चहा पाणी व प्रशस्तीपत्रकांचे वितरण करण्यात आले. अशा प्रकारे एक दिवशीय कार्यशाळा संपन्न झाली.

सोबत-कार्यशाळेची छायाचित्रे

## गांधी एज्युकेशन सोसायटी कुंडलचे
## क्रांतिअग्रणी जी. डी. बापू लाड महाविद्यालय, कुंडल
## ता. पलूस जि. सांगली
## अग्रणी महाविद्यालय योजने अंतर्गत एक दिवशीय कार्यशाळा
## विषयः भारतीय अर्थव्यवस्थेपुढील सामाजिक व आर्थिक समस्या

## दि. 31/01/2020

## अहवाल

आमचे क्रांतिअग्रणी जी. डी. बापू लाड महाविद्यालयात शुक्रवार दिनांक 31/01/2020 रोजी शिवाजी विद्यापीठाच्या अग्रणी महाविद्यालय योजने अंतर्गत 'भारतीय अर्थव्यवस्थेपुढील सामाजिक व आर्थिक समस्या' या विषयावर एक दिवशीय कार्यशाळा संपन्न झाली. सदर कार्यक्रमा करीता दोन सत्रांचे आयोजन करण्यात आले होते. प्रथम सत्रात कार्यशाळेस मार्गदर्शक व्यक्ती म्हणून उपस्थित असणारे वक्ते, शिक्षक विद्यार्थी यांची नाव नोंदणी चहा व अल्पोपहार आणि कार्यशाळेच्या उद्‌घाटनाचा समावेश होता.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक व स्वागत महाविद्यालयाचे अग्रणी विभाग समन्वयक डॉ. व्ही. आर. माने यांनी केले. यावेळी बोलताना त्यांनी महाविद्यालयात सन 2019- 20 या शैक्षणिक वर्षात अग्रणी महाविद्यालय योजना व त्याचा हेतू, उद्देश आणि फलश्रुती याबाबत सविस्तरपणे संबोधित केले. कार्यशाळेचे उद्‌घाटन महावीर महाविद्यालय, कोल्हापूर अर्थशास्त्र विभागातील डॉ. आर. जी. कोरबू यांचे हस्ते झाले. त्यांनी भारतीय अर्थव्यवस्थेपुढील सामाजिक व आर्थिक समस्या यांचा आढावा घेतला. कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. पी. बी. लाड हे होते. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन अग्रणी विभाग सदस्य डॉ. एस. जी. चवरे यांनी मानले.

प्रथम सत्रामध्ये भारतीय अर्थव्यवस्थेपुढील सामाजिक व आर्थिक समस्या या विषयावर डॉ. आर. जी. कोरबू यांचे व्याख्यान झाले त्यांनी आपल्या व्याख्यानांमध्ये भारतीय अर्थव्यवस्थेपुढील सामाजिक समस्यांचे महत्त्व विशद केले. या सत्राचे आभार डाॅ. एम. जी. सदामते यांनी मानले.

दुसऱ्या सत्रामध्ये आर्ट्स ॲण्ड कॉमर्स कॉलेज, कराड येथील डॉ. ए. के. पाटील यांचे व्याख्यान झाले. आपल्या व्याख्यानामध्ये त्यांनी भारतीय अर्थव्यवस्थपुढील आर्थिक समस्यांचा सविस्तर आढावा घेतला. कार्यक्रमाचे आभार अग्रणी विभाग सदस्य डॉ. पी. बी. लुपने यांनी मानले.

यानंतर शाकाहारी भोजनाची व्यवस्था करण्यात आली होती. भोजनानंतर उपस्थितांना चहा पाणी व प्रशस्तीपत्रकांचे वितरण करण्यात आले. अशा प्रकारे एक दिवशीय कार्यशाळा संपन्न झाली.

सोबत- कार्यशाळेची छायाचित्रे